नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - २९०<br>Issue - 290 | वार गुरुवार दि. १२ मार्च २०२६<br>Blow- Thursday Date 12 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# देशातील पहिली ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था महाराष्ट्रच

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; महाराष्ट्राची अर्थव्यवस्था दोन वर्षांत 'युएई' आणि सिंगापूरपेक्षा मोठी होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राचा जीडीपी २०१३ - १४ मध्ये १६ लाख कोटी होता. पुढील दहा वर्षांत आम्ही तो ५१ लाख कोटींवर नेला. आमच्या काळात राज्याची अर्थव्यवस्था तीपटीहून अधिक वाढली. ही गती पाहता, येत्या दोन-तीन वर्षांत म हाराष्ट्र सिंगापूर आणि युएईसारख्या बलाढ्य अर्थव्यवस्थांनाही मागे टाकेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधानसभेत व्यक्त केला.

अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. विरोधकांनी उप-स्थित केलेले विविध मुद्दे खोडून काढत त्यांनी राज्याच्या 'ट्रिलियन डॉलर' अर्थव्यवस्थेचा रोडमॅप सभागृहासम ोर मांडला. विरोधकांच्या टीकेला सांख्यिकीय पुराव्यांनी उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था विस्तारत आहे. महाराष्ट्र हे वेगळे राष्ट्र असते, तर आपली अर्थव्यवस्था जगात ३०वी असती. पहिल्या ३५ देशांचा विचार केला तर महाराष्ट्राने ऑस्ट्रिया, थायलंड, नॉर्वे, फिलिपाईन्स, व्हिएतनाम आणि बांगलादेश या देशांनाही मागे टाकत मोठी अर्थव्यवस्था उभी केली आहे. पुढील २-३ वर्षांत युएई आणि सिंगापूर यांच्या अर्थव्यवस्थेलाही मागे टाकू. अर्थसंकल्पात छत्रपती शिव-ाजी महाराजांचा उल्लेख केलेला नाही, अशी टीका आमदार जयंत पाटील यांनी केली होती. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, हे सरकार छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांना कधी विसरू शकत नाही. कारण, ते होते म्हणून आम्ही आहोत, असेही त्यांनी सांगितले.

निधी वाटपात भाजपला झुकते माप मिळाल्याच्या आरोप जयंत पाटील यांनी केला. अर्थसंकल्पातील विभागनिहाय तरतुदी पाहता, ५९ टक्के निधी भाजप, २२ टक्के शिवसेना आणि राष्ट्रवादीकडील खात्यांना केवळ १९ टक्के निधी मिळाल्याची टीका पाटील यांनी केली. त्याचा समाचार घेताना मुख्यमंत्र्यांनी महाविकास आघाडीच्या काळातील आकडेवारीच मांडली. ते म्हणाले, मविआ सरकारच्या काळात मुख्यमंत्री पद असलेल्या शिवसेनेला (एकत्रित) केवळ १६ टक्के निधी मि ळाला होता, तर राष्ट्रवादीने ५७ टक्के स्वतःकडे ठेवला. काँग्रेसला २६ टक्के निधी देण्यात आला. त्यामुळे निधी हा खातेनिहाय मिळतो, पक्षनिहाय नाही, याची आठवण मुख्यमंत्र्यांनी करून दिली.



**अर्थव्यवस्थेत ७.९ टक्के दराने वाढ**

मुख्यमंत्री म्हणा-ले, २०१३-१४ मध्ये राज्याचा एकूण जीडीपी १६ लाख कोटी रुपये होता, तो गेल्या १० वर्षांत ५१ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. म्हणजेच राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तीनपट विस्तार आमच्या कार्यकाळात झाला. राज्याची अर्थव्यवस्था सध्या ७.९ टक्के दराने वाढत असून दरडोई उत्पन्न ३ लाख १७ हजार रुपयांवरून ३ लाख ४७ हजार रुपयांपर्यंत वाढले आहे. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत महाराष्ट्र देशात पाचव्या क्रमांकावर असला, तरी लोकसंख्या आणि जीएसडीपीचा विचार केला तर राज्य अव्वल असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा १४.३ टक्के आहे. परकीय गुंतवणूक (एफडीआय) आणि तेलविरहित निर्यातीत राज्य पहिल्या क्रमांकावर आहे, तर सॉफ्टवेअर विकासात दुसऱ्या क्रमांकावर आहे. स्टार्टअप्स आणि वृक्षआच्छादनातही महाराष्ट्र आघाडीवर मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

**उत्पन्नातील वाढ जाणीवपूर्वक दुर्लक्षित**

राज्यावरील कर्ज ९.३२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढल्याचा विरोधकांचा आरोप फेटाळताना फडणवीस म्हणाले की, उत्पन्नातील वाढ जाणीवपूर्वक दुर्लक्षित केली जात आहे. राज्याचे कर्ज-उत्पन्न गुणोत्तर सध्या १८.२ टक्के असून पुढील वर्षी ते २० टक्क्यांपर्यंत जाईल असे अनेकांनी सभागृहात सांगितले. परंतु, ती मर्यादा ओलांडली जाणार नाही, याची खबरदारी सरकार घेत आहे.

राज्याला २०१३-१४ मध्ये १३ हजार २४१ कोटी रुपयांचे सहाय्यक अनुदान मिळत होते, ते आता ६८ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचले असून यात पाचपट वाढ झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राजकोषीय तूट ३ टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्यात म हाराष्ट्राने यश मिळवले असून महसुली तूटही एक टक्क्यांच्या आत राखली असल्याचे त्यांनी नमूद केले. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने वित्तीय शिस्त पाळली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तेलंगणाचे दरडोई उत्पन्न जास्त असल्याचा दावा केला जात असला तरी तेथे राजकोषीय तूट ३.५ टक्क्यांपेक्षा अधिक असल्याने वित्तीय शिस्त राखली गेली नसल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे भांडवली खर्च २०१३-१४ मध्ये २५ हजार १२९ कोटी रुपये होता, तो आता वाढून दोन लाख कोटी रुपयांपर्यंत पोहा-ेचला आहे. कर्ज वाढीच्या तुल-नेत भांडवली गुंतवणूक अनेक पटीने जास्त असल्याचे त्यांनी सांगितले.

**सुनील प्रभूंना कर्जबाजारी घोषित करायचे का?**

राज्यावर ९.३२ लाख कोटी रुपयांचे कर्ज झाल्याने महाराष्ट्र दिवाळखोरीच्या वाटेवर आहे, असा आरोप उबाठा गटाच्या सुनील प्रभू यांनी केला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, मी सुनील प्रभूंचे निवडणुकीचे शपथपत्र वा-चले. त्यात त्यांची संपत्ती १४ कोटी आहे आणि दायित्व ३ कोटी ५४ लाख. त्यांच्या मालमत्तेच्या तुल-नेत दायित्वाचे प्रमाण २५.२८ टक्के असल्याचे सांगत राज्यावरील दायित्व १८ टक्के असल्याने त्यावरून राज्याला कर्जबाजारी म्हणणे योग्य नाही, असा टोला त्यांनी लगावला.

**जयंत पाटलांनी नॅरेटीव्ह तयार करू नये**

मणिकर्णिका घाट तोडल्याचा आरोप जयंत पाटील यांनी केल्याचा उल्लेख करत फडणवीस म्हणाले की, या घाटाला पुरातत्त्व विभागाचे संरक्षण असून त्यांच्या परवानगीनेच संवर्धनाची कामे सुरू आहेत. त्याम ुळे अशा प्रकारचा नॅरेटिव्ह निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये.

महाराष्ट्राने सध्या ६६० अब्ज डॉलर अर्थव्यवस्थेचा टप्पा गाठला असून २०२९ पर्यंत स्थिर किमतींच्या आधारावर राज्य ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशातील पहिली ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था महाराष्ट्रच होईल, असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील जलसिंचन क्षमता सध्या ८१ लाख हेक्टर असून नदीज-ोड प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर यात आणखी वाढ होईल. ऊर्जा क्षेत्रात अर्थसंकल्पीय तरतुदींव्यतिरिक्त सुमारे ३ लाख १२ हजार कोटी रुपयांची खासगी गुंतवणूक होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

राज्याची आर्थिक स्थिती अत्यंत उत्तम असल्याचे मी म्हणणार नाही. परंतु, अडचणीच्या परिस्थितीत मार्ग काढण्याची क्षमता महाराष्ट्राकडे आहे. दिवंगत अजित पवार यांनी राज्याची आर्थिक शिस्त राखली होती. त्याचप्रमाणे पुढेही आर्थिक शिस्त राखली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# ३२ देशांचा महत्त्वपूर्ण निर्णय; तेल संकट दूर होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: मध्य पूर्व आशियात सुरू असलेल्या भीषण युद्धामुळे जागतिक तेल बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे. ही अस्थिरता दूर करण्यासाठी 'इंटरनॅशनल एनर्जी एजन्सी'ने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. बुधवारी झालेल्या बैठकीत ३२ सदस्य देशांनी आपल्या आपत्कालीन साठ्यातून ४०० दशलक्ष बॅरल कच्चे तेल बाजारात आणण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जगावर आलेलं तेल संकट काही प्रमाणात दूर होण्याची आशा निर्माण झाली आहे. ही बाब काही अंशी दिलासा देणारी आहे. सध्या भारतासह जगभरातले अनेक देश तेल संकटात सापडले आहेत. खए चे कार्यकारी संचालक फातिह बिरोल यांनी स्पष्ट केले की, सर्व सदस्य देशांनी एकमताने हा निर्णय घेतला आहे. यापूर्वी २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्धादरम्यान १८२ दशलक्ष बॅरल तेल अशाच पद्धती-ने बाजारात आले होते. मात्र यावेळची आकडेवारी त्याच्या दुप्पट आहे. इराणने 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ' हा महत्त्वाचा सागरी म ार्ग बंद केल्याने जागतिक पुरवठ्यावर २० टक्क्यांहून अधिक परिणाम झाला आहे, त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा ठरेल. त्याच फायदा तेल संकटाशी सामना करणाऱ्या देशांना होणार आहे. सध्या तेल बाजारपेठ अभूतपूर्व संकटाचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत ३२ देशांनी एकत्र येणे हे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी दिलासादायक आहे. हा साठा प्रत्येक देश आपल्या सोयीनुसार ठराविक कालमर्यादेत बाजारात उपलब्ध करून देईल.

# भारतीय संघावर पैशांचा पाऊस; बीसीसीआयनंतर आता आयसीसीकडून बक्षिस रक्कम जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: ८ मार्च रोजी २०२६च्या टी-२० विश्वचषकाच्या विजेत्याची घोषणा करण्यात आली. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करून सलग दुसऱ्यांदा T20 World Cup २०२६ जिंकण्याचा उल्लेखनीय पराक्रम केला. टीम इंडिया आपले जेतेपद राखणारा पहिला संघ ठरला. शिवाय, घरच्या मैदानावर जेतेपद जिंकणारा हा पहिला संघ आहे. यापूर्वी इतर कोणत्याही संघाने हा पराक्रम केला नव्हता. टीम इंडियाच्या विजयानंतर, बीसीसीआयने भारतीय खेळाडूंसाठी १३१ कोटी रुपयांची मोठी बक्षीस रक्कम जाहीर केली. आता, आयसीसीने बक्षीस रकमेबाबतही एक महत्त्वाची घोषणा केली आहे.




आयसीसीने २०२६ च्या पुरुष टी२० विश्वचषकासाठी खेळाडूंमध्ये १ अब्ज रुपयांपेक्षा जास्त रक्कम वाटली जाईल अशी घोषणा केली आहे. आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर, आयसीसीने स्पर्धे च्या खेळाडूंच्या बक्षीस रकमेच्या पूलचे ११.२५ दशलक्ष डॉलर्स म्हणजे भारतीय संघाला २४.२८ कोटी रुपये मिळतील. आयसीसीनुसार, विजेत्या संघाच्या रूपात टीम इंडियाला सर्वाधिक रक्कम २,६३९,४२३ अमेरिकन डॉलर्स किंवा अंदाजे २४२.८ दशलक्ष डॉलर्स मिळतील. उपविजेत्या न्यूझीलंडला अंदाजे १३९ दशलक्ष डॉलर्स मिळतील. दक्षिण आफ्रिका तिसऱ्या क्रमांकावर आहे, त्याला १००५,५७७ डॉलर्स किंवा अंदाजे ९२.५ दशलक्ष डॉलर्स मिळतील. सेमीफायनलमध्ये टीम इंडियाकडून पराभूत झालेल्या इंग्लंडला ९० दशलक्ष डॉलर्सपेक्षा कमी रक्कम मिळेल. दरम्यान, वेस्ट इंडिज संघाला ४९.५ दशलक्ष डॉलर्स मिळतील.

पाकिस्तान सुपर ८ टप्प्याच्या पुढे जाण्यात अपयशी ठरला. म्हणूनच पाकिस्तान आयसीसीकडून सर्वाधिक रक्कम मिळवणाऱ्या टॉप पाच संघांमध्ये नाही. पाकिस्तानला फक्त ४८.१ दशलक्ष डॉलर्स मिळतील. कॅनडा, ओमान आणि नामि बियाला सर्वात कमी रक्कम मि ळाली, तिन्ही संघ गट टप्प्यातच बाहेर पडले.

# देशाची आर्थिक कोंडी! 'विश्वगुरु' असल्याचा डांगोरा पिटणाऱ्या पंतप्रधानांचे मात्र मौन, महागाईवरुन कोल्हेंचा हल्लाबोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : इराण-इस्रायलमध्ये सुरु असलेल्या युद्धाचा परिणाम जगातील अनेक देशांवर होत आहे. भारताला देखील मोठा फटका बसत आहे. घरघ-ुती गॅस सिलेंडरचा मोठा तुटवडा भासत असल्याचं चित्र महाराष्ट्रात पाहायला मिळत आहे. याचा मोठा फटका हॉटेल व्यवसायिकांना बसत आहे. दरम्यान, या वाढत्या महागाईच्या मुद्यावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी सरकारव रटीका केली आहे. रशिया, युक्रेन आणि इराण-इस्रायलम धील युद्धाचे पडसाद उमटतायत खरंय, पण त्या आडून जनतेला महागाईच्या खाईत लोटणं हे कोणत्या धोरणात बसतं? असा सवाल कोल्हे यांनी केला आहे.

माझ्या मतदारसंघातील चाकण चखऊ असो वा हडपसर-भोसरीचा पट्टा; आज उद्योगांना ऊर्जेचा आणि इंधनाचा प्रचंड तुटवडा जाणवतोय. अनेक कंपन्या ५० टक्के क्षमतेने चालतायत, तर काहींनी उत्पादने थांबवली आहेत. कामगारांच्या हाताला काम नाही आणि उद्योजकांच्या डोक्यावर चिंतेचं सावट आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देशात गॅस पुरवठा खंडित होतोय, हॉटेलं बंद पडतायत, कष्टकऱ्यांचा रोजगार जातोय, आंतरराष्ट्रीय धोरणाच्या नाव-ाखाली इंधन दरवाढ थोपवण्यात सरकार अपयशी ठरलंय. परिणामी, आमच्या शेतकऱ्यांची हक्काची साखर बंदरांवर धूळ खात पडून आहे आणि शेतमाल सडतोय. पण दुर्दैव असं, की देशाची ही आर्थिक कोंडी होत असताना 'विश्वगुरु' असल्याचा डांगोरा पिटणारे सरकार आणि मा. पंतप्रधान मात्र मौन बाळगून आहेत.

सरकारने तात्काळ पार्लमेंटरी जॉइंट कमिटीची बैठक बोलावून चर्चा करावी


या गंभीर परिस्थितीवर तातडीने तोडगा काढण्यासाठी म ाननीय खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या मागणीनुसार, सरकारने तात्काळ पार्लमेंटरी जॉइंट कमिटीची बैठक बोलावून यावर सविस्तर चर्चा घडवून आणावी ही आमची आग्रही मागणी आहे. परराष्ट्र धोरण जर देशांतर्गत सुरक्षा आणि स्वस्त जीवन देऊ शकत नसेल, तर ते धोरण सपशे-ल फसलेलं आहे. माझ्या तमाम जनतेला विनंती आहे की परिस्थिती बिकट आहे, गॅस आणि इंधनाचा वापर अत्यंत जपून करा. संकटाच्या काळात एकमेकांना आधार द्या. सरकार झोपलंय, मात्र आपण जागृत राहूया असे कोल्हे म्हणाले. इराण-इस्रायल युद्धाचा मोठा परिणाम जगातील अनेक देशांवर होत आहे. आतापर्यंत, फक्त कच्च्या तेलाच्या आणि वायूच्या किमती वाढण्याबद्दल चर्चा सुरु होती. परंतू, अर्थतज्ज्ञांचे मते हे केवळ अर्धे चित्र आहे. होम ुझच्या सामुद्रधुनीतून तेल वाह-तूक थांबण्यापेक्षाही धोकादायक म्हणजे खत पुरवठा साखळीतील व्यत्यय. हे एक असे संकट आहे जे येत्या काही महिन्यांत जागतिक अन्न उत्पादन मंदा-वेल आणि महागाई नवीन पा-तळीवर जाण्याची शक्यता आहे. शेतीच्या गरजांसाठी आयातीवर मोठ्या प्रमाणात भारत अवलंबून आहे.

## केंद्रीयमंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती

# सरकारने काळजी घेतलीय, घरगुती गॅस कुठेही कमी पडणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : इराण आणि अमेरिका, इस्रायलच्या युद्धाचे जगातील विविध देशांवर परिणाम झाले असून आखा-ती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन आणि गॅस पुरवठ्यावर त्याचा परिणाम झाला आहे. भारतात गेल्या काही दिवसांत गॅसचा पुरवठा घटल्याने हॉटेल व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहेत. गॅसच्या तुटवड्यामुळे पुण्यात १० हजारांपेक्षा जास्त लग्नसोहळे पुढे ढकलण्यात आल्याची माहिती आहे. यासंदर्भात आता पुण्याचे सुपुत्र आणि केंद्रीयमंत्री मुरलीधर मोहोळ (चींीश्रळव-हरी ाहेश्र) यांनी माहिती दिली. देशात सुरू असलेल्या घरगुती गॅसच्या तुटवड्यांसदर्भात भारत सरकारने १०० टक्के काळजी घेतली आहे. देशभरात व्यावसायिक गॅस दिला जातो, तो थांबवला आहे आणि कमी केलाय. घरगुती गॅस म्हणून प्राधान्य दिल जात आहे, घरगुती गॅस कुठेही कमी पडणार नाही याची काळजी सरकार घेत आहे. त्यामुळे, याची चिंता करण्याचं कारण नाही, असे केंद्रीयमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलंय.






गॅस एजन्सीकडून काळाबाजार होत असल्याच्या गोष्टी कानावर येत आहेत, त्याची दखल घेतली जाईल. घरगुती गॅस कुठेही कमी पडणार नाही याची काळजी सरकार घेत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे जी परिस्थिती निम र्ण झाली आहे, त्यामुळे आपल्याला हा निर्णय घ्यावा लागला. त्यासाठी, काही काळ जावा लागेल. मात्र, घरगुती गॅस कमी पडणार नाही, असेही मुरलीधर मो-होळ यांनी स्पष्ट केले. दरम्यान, आखाती देशात सुरू असलेल्या युद्धामुळे भारतातील गॅस वितरणावर थेट परिणाम झाला असून देशासह राज्यात अनेक ठिकाणी घरगुती गॅस ग्राहकांनी दुकानांच्या बाहेर गर्दी केली आहे. मात्र, नाशिकच्या येवल्यात वेगळं चित्र आहे. सध्या गॅस वितरण व्यवस्था सुरळीत सुरू असून ओटीपी प्रणाली राबवल्यामुळे घरगुती ग्राहकांना वेळेत गॅस मिळत आहे. त्यामुळे ग्राहकांची सध्यातरी दुकानांवर रांगा दिसत नसल्याची माहिती येथील वितरकांनी दिली आहे.

विमानाचे तिकीट दर वाढल्यासंदर्भाने मुरलीधर मोहोळ यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर, तिकीट दरवाढीची माहिती घेतली जात आहे, त्याच्यावर व्यवस्था काम करत आहे. तिकीट वाढ कुठे केली असेल तर ते सुधारले जाईल, असे मोहोळ यांनी सांगितले.

गॅस तुटवड्याच्या पार्श्वूमीवर काँग्रेसने देशभरात आंदोलन सुरू केले असून मोदी कुठे आहेत असा प्रश्नही विचारला जात आहे. यासंदर्भात, काँग्रेस काय बोलती यापेक्षा देशातील जनता काय बोलते हे महत्वाचं आहे. देशातील प्रत्येक नागरिक समाधानी आहे. देशाच्या नेतृत्वावर विश्वास आहे, त्यांना माहिती आहे देश सुरक्षित आहे. युद्धामुळे बाकी ठिकाणी जी परिस्थिती निर्माण झाली आहे, तशी आपल्याकडे नाही, अशी प्रतिक्रिया मोहोळ यांनी दिली.

## संपादकीय....

### तेल संकट

मध्य पूर्व आशियात सुरू असलेल्या भीषण युद्धामुळे जागतिक तेल बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे. ही अस्थिरता दूर करण्यासाठी 'इंटरनॅशनल एनर्जी एजन्सी'ने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. बुधवारी झालेल्या बैठकीत ३२ सदस्य देशांनी आपल्या आपत्कालीन साठ्यातून ४०० दशलक्ष बॅरल कच्चे तेल बाजारात आणण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जगावर आलेलं तेल संकट काही प्रमाणात दूर होण्याची आशा निर्माण झाली आहे. ही बाब काही अंशी दिलासा देणारी आहे. सध्या भारतासह जगभरातले अनेक देश तेल संकटात सापडले आहेत. खए चे कार्यकारी संचालक फातिह बिरोल यांनी स्पष्ट केले की, सर्व सदस्य देशांनी एकमताने हा निर्णय घेतला आहे. यापूर्वी २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्धादरम्यान १८२ दशलक्ष बॅरल तेल अशाच पद्धतीने बाजारात आले होते. मात्र यावेळची आकडेवारी त्याच्या दुप्पट आहे. इराणने 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ' हा महत्त्वाचा सागरी मार्ग बंद केल्याने जागतिक पुरवठ्यावर २० टक्क्यांहून अधिक परिणाम झाला आहे, त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा ठरेल. त्याच फायदा तेल संकटाशी सामना करणाऱ्या देशांना होणार आहे. सध्या तेल बाजारपेठ अभूतपूर्व संकटाचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत ३२ देशांनी एकत्र येणे हे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी दिलासादायक आहे. हा साठा प्रत्येक देश आपल्या सोयीनुसार ठराविक कालमर्यादेत बाजारात उपलब्ध करून देईल. इराणने पुरवठ्याचा मुख्य मार्ग असलेला 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ' रोखल्यामुळे जगाची चिंता वाढली होती. जगातील २० टक्के तेलाची वाहतूक याच मार्गावरून होते. मात्र, आता खए देशांकडे असलेल्या १.२ अब्ज बॅरलच्या साठ्यापैकी मोठा हिस्सा बाहेर काढला जाणार आहे. संकटकाळात सर्व देशांनी एकत्र येऊन तोडगा काढणे गरजेचे आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांची विधान भवनाला भेट




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज माढा व पंढरपूर जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांनी विधान भवनात अर्थसंकल्पी अधिवेशनाचे कामकाज प्रेक्षक गॅलरीतून प्रत्यक्ष पाहून लोकशाही प्रक्रियेचा अनुभव घेतला.

सभागृहातील काम काज कशा पद्धतीने चालते लोकप्रतिनिधी जनतेचे प्रश्न कसे मांडतात? राज्याच्या विकासासाठी निर्णय कसे घेतले जातात याची माहिती सांगितली. आपण देखील पुढच्या दिवसात गट व गणातील जनतेचे प्रश्न पोट तिडकिने मांडून त्यावर विकासाच्या दृष्टीने वाटचाल कशी करावी याच्या शुभेच्छा.

या भेटी दरम्यान तालुक्यातील विकास कामे, शेती विषयक प्रश्न, पाणी व्यवस्थापन तसेच स्थानिक पातळीवरील विविध प्रलंबित विषयांवर सकारात्मक चर्चा केली, व ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवून त्या तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याची गरज असल्याची यावेळी सांगितले.

## माजी साखर आयुक्त डॉ. संजयकुमार भोसले यांची स्वेरीला सदिच्छा भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र राज्याचे साखर संचालक (प्रशासन) व साखर आयुक्तालयाचे माजी आयुक्त डॉ.संजयकुमार भोसले यांनी गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) ला अलीकडेच सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी इंजिनिअरिंग मधील प्राध्यापकांना विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.

स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी त्यांचे स्वागत केले. साखर आयुक्तालयातील प्रशासन व अर्थविषयक काम काजातील जाणकार अधिकारी म्हणून माजी साखर आयुक्त डॉ. संजयकुमार भोसले यांची ओळख आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण घेण्यासाठी बाहेर गावी जावे लागत होते हे पाहून डॉ बी. पी. रोंगे यांनी गोपाळपूरच्या माळरानावर २८ वर्षांपूर्वी इंजिनिअरिंगची स्थापना केली तेंव्हापासून विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तंत्रशिक्षणाबरोबरच फार्मसीचे डिप्लोमा डिग्री पीजी, तसेच एमबीए, एमसीए., पीएचडी अभ्यासक्रम आणि विधी (लॉ) कॉलेज सुरु असून त्यासाठी आवश्यक सर्व सुख सोयी आहेत. पाहुण्यांनी या सर्व बाबींविषयी माहिती जाणून घेतली. त्याचबरोबर स्वेरीच्या संशोधन विभाग. मैदान, प्रयोगशाळा, आयडीया लॅब अशा विविध विभागांना भेटी देवून स्वेरीतील विविधता जाणून घेतल्या. यावेळी स्वेरीची यशस्वी वाटचाल, संशोधनातील प्रगती याबाबत संशोधन अधिष्ठाता डॉ. एम.एस. अभिषेक यांनी सविस्तर माहिती दिली. माजी साखर आयुक्त भोसले म्हणाले की, 'पायाभूत क्षेत्रांमध्ये नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यासाठी भविष्यात अभियंत्यांची खूप गरज आहे. इतर क्षेत्रांमध्ये देखील भारतामध्ये नवनवीन रोजगारांच्या संधी उपलब्ध होत आहेत पण त्यासाठी विद्यार्थ्यामध्ये प्रतिभा, ज्ञान, इंग्रजी संभाषण कौशल्य आणि तांत्रिक कौशल्य यांचा समावेश असावा. आपला विद्यार्थी कुठेही काम करताना त्याच्या कामातील गुणवत्ता कमी होऊ नये यासाठी विविध प्रेरणादायी उपक्रम राबविणे आवश्यक आहे. असे सांगून साखर कारखान्यांचे प्रशासन, धोरणात्मक निर्णय आणि अर्थविषयक बाबीं यावर त्यांनी विशेष प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी स्वेरीतील संस्कृती आणि शिस्तीचे कौतुक केले. यावेळी प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस चंद्रशेखर पाटील, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम.पवार, डॉ. एच.बी. रोंगे, संशोधन अधिष्ठाता डॉ. एम.एस. अभिषेक, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभागाचे प्रा. अविनाश मोटे यांच्यासह इतर प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

## घाटकोपर मेट्रोमध्ये महिला प्रवाशांचा संतप्त प्रवास; ओव्हरक्राउडिंग आणि सुरक्षेच्या प्रश्नांमुळे संताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विजय घनघाव/प्रफुल्ल शेवाळे : मुंबई : मुंबई मेट्रो लाइन १ (वर्सोवा-घाटकोपर) ही शहरातील सर्वाधिक वापरली जाणारी मेट्रो लाइन असली तरी गेल्या काही काळात घाटकोपर परिसरातील मेट्रो प्रवास महिलांसाठी खूपच त्रासदायक ठरत असल्याचे दिसत आहे. पीक आवरमध्ये होणारी प्रचंड गर्दी, एसी फेल्युअर, आणि काही वेळा महिलांच्या सुरक्षेच्या घटना यामुळे महिला प्रवाशांमध्ये संताप वाढला आहे.

अलीकडेच सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये घाटकोपर-वर्सोवा मार्गावरील एका मेट्रो कोचमध्ये प्रवासी इतके दाटले होते की, आता मरायचं का? असे संतापलेले प्रश्न विचारले जात होते. महिलांनी सांगितले की, गर्दीमुळे श्वास घेणेही कठीण होते, तर काहींना मोबाईल किंवा इतर वस्तू चोरीला गेल्याच्या तक्रारीही आहेत. एसी बंद पडल्याने उकाडा असह्य होतो आणि महिलांना पुरुषांच्या गर्दीतून जागा मिळवणे कठीण होते, असे एका नियमित प्रवाशीने सांगितले.

महिला प्रवाशांच्या तक्रारींमध्ये मुख्यतः हे मुद्दे समोर आले आहेत:

ओव्हरक्राउडिंग: पीक आवरमध्ये महिलांसाठी आरक्षित जागा असूनही पुरुष प्रवासी त्यात शिरतात, ज्यामुळे महिलांना अस्वस्थता येते.

सुरक्षेचा अभाव: काही घटनांमध्ये छेडछाड किंवा अस्वस्थ वर्तनाच्या तक्रारी आल्या आहेत. मेट्रोमध्ये उउढत आणि सुरक्षा कर्मचारी असले तरी त्यांची संख्या अपुरी पडत असल्याचे मत आहे.

तांत्रिक बिघाड: एसी आणि इतर सुविधा वारंवार बंद पडणे, ज्यामुळे उकाडा आणि अस्वस्थता वाढते.

मुंबई मेट्रो वन (MMRCL) ने महिलांच्या सुरक्षेसाठी 'पिंक पावर' सारख्या उपक्रम राबवले असून, काही स्टेशनवर महिला स्टाफद्वारे संचालन आणि पाउडर रूम सारख्या सुविधा उपलब्ध आहेत. तरीही प्रवाशी म्हणतात की, हे पुरेसे नाही. प्रत्यक्ष कोचमध्ये महिलांसाठी वेगळे डबे किंवा अधिक सुरक्षा व्यवस्था हवी.



एक महिला प्रवाशी म्हणाली, दररोज सकाळी आणि संध्याकाळी हा प्रवास त्रासदायक झाला आहे. मेट्रो ही लोकल ट्रेनपेक्षा चांगली असायला हवी, पण आता तर तीही त्रास देणारी ठरतेय.

मेट्रो प्रशासनाने या तक्रारींची दखल घेऊन अधिक कोचेस चालवणे, पीक आवरमध्ये अतिरिक्त सुरक्षा आणि महिलांसाठी स्पेशल उपाययोजना करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे. अन्यथा, महिला प्रवाशांचा संताप अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.याचबरोबर राज्य महिला आयोगाने या प्रश्नाकरिता गंभीर दखल घेऊन योग्य त्या उपाय योजना सूचना आणि तत्सम कार्यवाही करणे गरजेचे आहे.



# समाज परिवर्तन युवा संस्था वतीने जागतिक महिला दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी / बाळासाहेब अहिरे : माता रमाबाई आंबेडकर नगर, खेमानी रोड लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विठ्ठल मंदिर उल्हासनगर-२ या ठिकाणी आंतरराष्ट्रीय जागतिक महिला दिन ठरल्याप्रमाणे साजरी करण्यात आला..

कार्यक्रमाची सुरुवात ही महामानवांच्या प्रतिमेला पुष्प-हार घालून करण्यात आली..

कार्यक्रमामध्ये महिलांसाठी संगीत खुर्च्या, निबंध स्पर्धा, आणि लहान मुलींसाठी नृत्य ठेवण्यात आले होते..

निबंध स्पर्धेत आणि नृत्य मध्ये मोठ्या प्रमाणात महिलांनी सहभाग घेतला होता, आणि सहभाग घेणाऱ्या महिलांना व लहान मुलींना /प्रमाणपत्र देऊन सन्मानित देखील करण्यात आलं.

त्याचबरोबर महिलांसाठी पाणी व नाष्ट्याची ही व्यवस्था ठेवण्यात आली होती. आणि प्रमुख पाहुणे म्हणून आम्ही काही वरिष्ठ मान्यवरांना आमंत्रित देखील केलं होतं आलेल्या मान्यवरांनी खूप चांगल्या पद्धतीने आपल्या भाषणाद्वारे उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले व तसेच महिलांच्या हक्कांना समर्थन देणे, समानता प्रोत्साहित करणे, आणि महिलांच्या योगदानाची कदर करणे, ह्या मुद्द्यांवर मान्यवरांनी महिलांना भाषणाद्वारे शुभेच्छा दिल्या. आणि अशाप्रकारे सर्वांच्या उपस्थितीने आणि साथीने हा आजचा जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम योग्यरीत्या आणि चांगल्या प्रकारे पार पडला...

सर्वांनी समाज परिवर्तन युवा संस्थेच्या कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त केले तसेच पुढील कार्यक्रमासाठी शुभेच्छा देऊन आणि पुढील सामाजिक कार्यासाठी आम्हाला प्रेरित देखील केले.

या कार्यक्रमात सहभाग असलेले जयेश जाधव, अतिश थोरात, रोहित वाघमारे, बाळासाहेब अहिरे, अशोक निकम, संजय खरात, रोहन गोडबोले होते

# कसारा रेल्वे स्थानकात वैद्यकीय सुविधांचा अभाव परंतु, माणुसकीच्या मदतीमधून रेल्वे स्थानकातच महिलेची प्रसूती...आणि गोंडस बाळाचा जन्म

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कसारा शहापूर/प्रफुल्ल शेवाळे : मध्य रेल्वेचे शेवटचे उपनगरीय रेल्वे स्थानक म्हणजेच कसारा स्थानक आहे.आज कसारा स्थानकात चक्क रेल्वे प्लॅटफॉर्म वर एका महिलेने एका गोंडस बाळाला जन्म दिला आहे. कसारा स्थानकात अगदीच माणुसकीचा प्रत्यय यावेळी पाहायला मिळाला आहे. मुंबई मधून बिहार ला जाणारे नागेंद्र कुमार यांची पत्नी ममता कुमारी यांना रेल्वे प्रवासा दरम्यान प्रसूती कळा सुरु झाल्या. दरम्यान कसारा स्थानकात सदर एक्सप्रेस ही इंजिन जोडण्या साठी थांबणार होती.

### वैद्यकीय सुविधा अभाव म्हणजे रेल्वे चा नाकर्तेपणा : राजेश घनघाव अध्यक्ष (कल्याण कर्जत कसारा रेल्वे संघटना

**कसारा सारख्या मोठया रेल्वे स्थानकात वैद्यकीय सुविधा अभाव म्हणजेच रेल्वे प्रशासनाचा नाकर्ते पणा असल्याचा आरोप राजेश घनघाव यांनी केला आहे. कसारा स्थानकात वनं रुपी क्लिनिक वैद्यकीय सुविधा करिता बांधले होते परंतु वैद्यकीय सुविधा चालू नं करता रेल्वे चे मोटर मन आणि गार्ड यांना विश्रांती गृह म्हणून देण्यात आले. पुढील आठवड्यात रेल्वे चे महाव्यवस्थापक यांची भेट घेणार असून लोकल सेवा वाढवणे आणि वैद्यकीय सेवा उपलब्ध करणे आणि इतर विषया करिता संघटनेकडून भेटीचे आयोजन करणार असल्याचे राजेश घनघाव यांनी म्हटलं आहे.**

दरम्यान एक्सप्रेस ट्रेन कसारा स्थानकात पोहोचताच काही सज्जन नागरिकांनी तत्परतेने पुढाकार घेतला. काळूबाई चंद्रकांत लहाने आणि सरला खंडू भानगीर यांनी तातडीने धाडस दाखवत प्रसूतीसाठी मदत केली. याच वेळी प्राथमिक आरोग्य केंद्र कसारा येथील शुक्ला मॅडम यांनी कर्तव्यदक्ष नर्स सिस्टर सोनाली सांगळे यांना ही माहिती दिली.

माहिती मिळताच सोनालीताई तात्काळ कसारा रेल्वे स्थानकावर दाखल झाल्या. रेल्वे स्टेशनवर कोणतेही वैद्यकीय इन्स्ट्रुमेंट उपलब्ध नसताना देखील त्यांनी अत्यंत धैर्य आणि कौशल्याने प्रसूतीची पुढील प्रक्रिया पूर्ण केली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आई आणि बाळ दोघेही सुरक्षित राहिले.

यानंतर म्ब्युलन्स चालक सतीश खरे, शोभा सोनवणे, जी.आर.पी.एफ. पोलिस शिपाई विष्णू सुपेकर, तसेच सरपंच प्रकाश वीर यांनी तातडीने मदत करत महिलेला प्राथमिक आरोग्य केंद्र कसारा येथे सुरक्षित पोहोचवून दाखल केले. सध्या महिलेची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

या संपूर्ण मोहिमेत ड्युटीवर असलेले स्टेशन मास्तर रोहित उबाळे आणि ठझऋ वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन मोरे यांनीही अत्यंत दक्षतेने आपले कर्तव्य पार पाडत माणुसकीचा धर्म जपला.

कसारा रेल्वे स्थानकावर घडलेली ही घटना म्हणजे संकटाच्या क्षणी अनेकांनी एकत्र येऊन केलेल्या मदतीची प्रेरणादायी कहाणी आहे. या सर्वांच्या धाडस, कर्तव्यनिष्ठा आणि माणुसकीमुळे एका नव्या जीवाचा सुरक्षित जन्म - आणि पुन्हा एकदा सिद्ध झाले की माणुसकीच सर्वात मोठा धर्म आहे.

सदर घटने बद्दल नेटकरी संमिश्र प्रतिक्रिया देताना दिसून येत होतें. अनेकांनी मदती साठी धावून आलेल्या नागरिकांचे आणि रेल्वे कर्मचारी तसेच नर्स सोनाली ताईचे आभार मानले आहेत तर काहींनी रेल्वे स्थानकात बेसिक वैद्यकीय सेवा आणि कर्मचारी तत्पर तेने उपलब्ध असावेत असं म्हटलं आहे.

कल्याण कसारा रेल्वे पॅसेंजर असोसिएशन चे माजी अध्यक्ष आणि सल्लगार शैलेश राऊत यांनी कसारा रेल्वे स्थानकात मूलभूत सुविधा असणारी वैद्यकीय रूम आणि त्यासाठी चा कर्मचारी यांची नितांत गरज असल्याचे म्हटलं आहे. रेल्वे चे वरिष्ठ अधिकारी यांच्या कडे तत्सम पत्र व्यवहार करून योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यासाठी आपण पाठपुरावा करणार आहोत असं शैलेश राऊत यांनी म्हटलं आहे.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसचा तुटवडा भासणार नाही : प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम

## नागरिकांनी इंधन व गॅस सिलेंडरची अतिरिक्त साठवणूक न करण्याचे आवाहन

**नागरिकांनी कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्हा प्रशासनाची बीपीसीएल, एचपीसीएल व आयओसीएल या इंधन व गॅस पुरवठा करणाऱ्या कंपनीशी चर्चा झालेली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडरचा कुठेही तुटवडा भासणार नाही. या अनुषंगाने जिल्ह्यातील नागरिकांनी पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडरची अतिरिक्त साठवणूक करू नये. तसेच कोणत्याही अफवावर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले आहे.

प्रभारी जिल्हाधिकारी श्री जंगम पुढे म्हणाले की, सोलापूर जिल्ह्यात मागणी प्रमाणे गॅसचा पुरवठा होणार आहे. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता गॅस सिलेंडरचा साठा करून ठेवू नये. गॅस पुरवठा कंपन्या व त्यांच्या एजन्सी यांच्याशी जिल्हा प्रशासन सातत्याने संपर्कात असून मागणीप्रमाणे गॅस पुरवठा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जिल्ह्यातील गॅस कंपनीचे समन्वय अधिकारी यांची तातडीची बैठक घेऊन गॅस सिलेंडर वाटप नियोजनाचा आढावा घेतलेला आहे. जिल्ह्यात एकूण ९४ गॅस एजन्सी कार्यरत आहेत. यामध्ये बीपीसीएल ५४, एचपीसीएल २० व आयओसीएल २० अशा गॅस एजन्सी आहेत. आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर या गॅस एजन्सी मार्फत गॅस सिलेंडर वितरण नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत, अशी माहिती संबंधित गॅस कंपनी समन्वय अधिकारी यांनी दिली. हे बदल खालील प्रमाणे...

१. गॅस एजन्सीमार्फत व्यावसायिक तत्त्वावर पुरविण्यात येणाऱ्या सर्व गॅस सिलेंडरचे बुकींग पुर्णतः बंद केलेले आहे. २. शासकीय संस्था, रुग्णालय, एनटीपीसी, अन्नछत्र मंडळ यांना वरील नियमामधून सूट देण्यात आलेली आहे. ३. व्यावसायिक तत्त्वावर पुरविण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडर बाबत उच्चस्तरीय चर्चा करणेत येत असून सर्व बार्बीचा विचार करून यावर निर्णय घेणेत येईल. ४. घरगुती गॅस सिलेंडर बुक केलेनंतरचा प्रतिक्षा कालावधी २५ दिवसांचा करणेत आलेला आहे. ५. घरगुती गॅस सिलेंडर वितरीत करताना कंपनीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या जढझ ची खातरजमा करणेत येत आहे. गॅस सिलेंडरचा दुरुपयोग होवू नये याकरीता जढझ पडताळणी अनिवार्य करणेत आलेली आहे. तसेच एघधउ ही करणेत येईल.

जिल्हा पुरवठा कार्यालयामार्फत गॅस सिलेंडर वितरण नियंत्रित करणे करीता तसेच काळाबाजार रोखणे याकरीता तालुका स्तरीय दक्षता पथक गठीत करणेत आलेले आहे. सदर दक्षता पथकांना गॅस एजन्सीच्या तपासण्या करून दैनंदिन गॅस सिलेंडर आवक जावक वर नियंत्रण ठेवणेबाबत निर्देशित करणेत आलेले आहे. सोलापूर जिल्हयाची घरगुती गॅस ग्राहकांची माहे फेब्रुवारी २०२६ अखेर एकुण संख्या ११,८८,२५८ इतकी आहे. सोलापूर जिल्हयाची व्यावसायिक गॅस ग्राहकांची माहे फेब्रुवारी २०२६ अखेर एकुण संख्या १०,८०० इतकी आहे. सोलापूर जिल्हयाकरीता घरगुती गॅस ची दैनंदिन गरज २५० मे.टन इतकी असून व्यावसायिक गॅस ची १० मे.टन इतकी आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे व अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली आहे.

# परेश सोनावणे यांना भिवंडी तालुका आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने ग्रामपंचायत अधिकारी संवर्गातील विविध आर्थिक वर्षांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांची आदर्श ग्रामसेवक म्हणून निवड करण्यात आली आहे. सन २०१५ ते २०१६, २०१६ ते २०१७, २०१७ ते २०१८, २०१८ ते २०१९, २०१९ ते २०२०, २०२० ते २०२१, २०२१ ते २०२२ तसेच २०२२ ते २०२३ या आर्थिक वर्षांतील कामगिरीच्या आधारे हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. या निवडीत भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे कार्यरत असलेले ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांना भिवंडी तालुका आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. कर्तव्यदक्ष आणि विकासाभिमुख अधिकारी म्हणून त्यांची ओळख असून त्यांच्या या निवडीमुळे भिवंडी तालुक्यातून तसेच इतर तालुक्यांतूनही त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

परेश सोनावणे यांनी डोहोळे ग्रामपंचायतीचा कार्यभार स्वीकारल्यानंतर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले. स्वच्छता, पायाभूत सुविधा आणि ग्रामविकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यामुळे ग्रामपंचायत डोहोळे ही तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत म्हणून आेळखली जाऊ लागली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली डोहोळे ग्रामपंचायतीला आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव तालुका व जिल्हा सुंदर गाव पुरस्कार मिळाला आहे. तसेच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत घेण्यात आलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ गाव स्पर्धेत डोहोळे ग्रामपंचायतीने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. नुकत्याच पार पडलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यक्रमात ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे भेट देऊन पंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्या कार्याची विशेष दखल घेत त्यांच्या कामाचे कौतुक केले होते.या पुरस्कारामुळे भिवंडी तालुक्यातील ग्रामविकास कार्याला नवे बळ मिळणार असून ग्रामपंचायत अधिकारी म्हणून परेश सोनावणे यांच्या कार्याची दखल घेतली गेल्याने सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

> **मला 'तालुका आदर्श ग्रामपंचायत अधिकारी' पुरस्कार जाहीर झाल्याचा आनंद आहे. आज माझी आजी असती तर तिचा आनंद गगनात मावेनासा झाला असता. हा सन्मान मी माझ्या आजीला अर्पण करतो.**
>
> **– पंचायत अधिकारी परेश सोनावणे**

# फाटे ट्रॅक्टर्स शोरूम मध्ये न्यू हॉलंड ३६३० रॉकेट ट्रॅक्टरचे लॉन्चिंग



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कोर्टी येथील फाटे ट्रॅक्टर्स शोरूम मध्ये शेतकरी बांधवांसाठी शक्तिशाली व अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज न्यू हॉलंड ३६३० रॉकेट ट्रॅक्टर या नवीन मॉडेलचे लॉन्चिंग मोठ्या उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमास टेरिटरी मॅनेजर सचिन वडगुले, सर्विस हेड टेरिटरी तिवारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापारी भागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्यासह अनेक मान्यवर शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अल्पावधीतच फाटे ट्रॅक्टर्सने शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून मोठी गरुड झेप घेतली आहे.

पुढील काळात शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होण्यासाठी नवीन तंत्रज्ञान असलेले ट्रॅक्टर्स देण्याचा प्रयत्न असल्याचे नागेश फाटे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी संजय पवार, गणेश दूरतकर, नवनाथ बचुटे सर, गोरख बागल, भास्कर गायकवाड, हनुमंत फाटे सर, जैनुद्दीन मुलानी, डॉ रमेश फाटे, संजय बागल, प्रभाकर बागल, बाळासाहेब बागल, बापूराव बागल, बळीराम गीड्डे, ओंकार फाटे, गणपत शिंदे, ब्रह्मदेव पाटील, परमेश्वर बागल, औदुंबर माने, अभिमन्यू पवार, उमेश फाटे,शुभम फाटे, बंडू चव्हाण, संतोष पुणेकर, आदमीला मॅडम, ओंकार कथले, बापूराव इंगळे, बापू कोळी, निलेश फाटे, समाधान बागल, ओंकार मासाळ सकटे, ऋषिकेश बागल उपस्थित होते.

# सोलापूर महानगरपालिकेत महिला वाहकांचा गौरव, शिवकृपा कंपनीकडून अनोखा उपक्रम




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमातील महिला वाहकांनी गेल्या अनेक वर्षापासून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उल्लेखनीय सेवा दिली आहे. व त्याच्या या कष्टाचे आणि योगदानाचे कौतुक करण्यासाठी महिला दिनानिमित्त सात रस्ता बस डेपो इथे एका विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते कोल्हापुर येथील शिवकृपा प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या वतीने हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमात प्रत्येक महिला कर्मचाऱ्याला साडी, व मानाचा फेटा, हार, शाल आणि श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच पेढे भरून त्यांचे तोंड गोड करण्यात आले व याप्रसंगी मुख्य नियंत्रण अधिकारी व्यंकटेश गोडसेलू आणि प्रभारी वाहतूक निरीक्षक सतेज गुंड उपस्थित होते.महिला वाहक अत्यंत पतीकुल परिस्थितीत आपली सेवा सोप दाखवत आहेत, व त्यांचा हा सत्कार त्यांच्या कामाला दिलेली पावती आहेअशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी परिवहन विभागाचे मुख्य नियंत्रण अधिकारी व्यंकटेश गुड शेलू प्रभारी वाहतूक निरीक्षक सतीश गुंड महिला वाहक सविता हिंगणकर महिला वाहक जयश्री होऊन पारखे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना उपक्रमाबद्दल माहिती दिली व कार्यक्रमाला प्रभारी वाहतूक निरीक्षक सतीश गुंड, सेवा मदतनीस शहाजी भोजने, वाहतूक निरीक्षक अंकुश बोराडे आणि शिवकृपा प्रावेट लिमिटेड कंपनीचे सहाय्यक रवी काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सत्कार आरती महिला कर्मचारी व सोहळ्यात सुजाता बिराजदार, रूपा कल्यान सिटी मनीषा बदलपुरी सुप्रिया बिराजदार राजनंदनी गायकवाड नागोबा बाई जनगे लक्ष्मी तळ भंडारे जयश्री फोन पारखे शिल्पा चितळी निर्मला बिराजदार विजय लक्ष्मी झळके वैशाली कवडे आणि सविता हिंगणकर या महिला वाहकांचा सत्कार करण्यात आला. परिवहन उपक्रमातील मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या कर्मचारी वर्गाच्या उत्साहात हा सोहळा पार पडला.

**पंचशील बुद्ध विहारात जागतिक महिला दिनानिमित्त १६१ वी कार्यशाळा संपन्न**

# महिलांनी वृद्ध माता-पिता, सासू-सासरे यांना सन्मानाने सांभाळले पाहिजे : बी. बी. मेश्राम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, पंचशील बुद्ध विहार समिती व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १६१ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनातत्मक कार्यशाळा पंचशील बुद्ध विहार, कैलास नगर, छत्रपती संभाजीनगर येथे ८ मार्च २०२६ ला संपन्न झाली.

फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, ९ मार्च १९११ पासून युरोपियन देशात जागतिक महिला दिन साजरा केला जात होता. ८ मार्च १९१७ ला रशियात कामगारांनी ब्रेड व शांतीसाठी स्ट्राईक केला होता. व्लादिमीर लेनिन यांनी १९२२ ला जागतिक महिला दिन जाहीर केला होता. ८ मार्च १८७५ ला युनो ने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे ८ मार्च ला जागतिक महिला दिन साजरा केला जातो. २० जुलै १९४२ ला नागपूरच्या महिला परिषदेत बोलताना बाबासाहेब म्हणाले होते की, कोणत्याही समाजाची प्रगती त्या समाजात महिलांच्या झालेल्या प्रगतीवरून मी मोजत असतो. त्याची पूर्तता करण्यासाठी भारताचे संविधानात महिलांसाठी अनेक तरतुदी केल्यात त्यातील प्रमुख तरतूद म्हणजे समानतेची होय. तसेच ९ मार्च १९२४ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाच्या उत्थानासाठी केंद्रीय संस्था निर्माण करण्याचे अनुषंगाने मुंबईच्या दामोदर हॉल येथे बैठकीचे आयोजन केले होते, ज्यात एर्वीलरींश, सळींरींश रपव जीसरपळीश अर्थात सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटित व्हा असा स्पष्ट संदेश दिला होता. हाच संदेश पुढे चालून बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य ठरले. या त्रिसूत्रीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९४२ ला नागपूर परिषदेत सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटीत व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधी धीर सोडू नका. या पंचसूत्रीत विस्तारित केलेले आहे. २९ मार्च १९३६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मत विकणे हा गुन्हा तर आहेच शिवाय तो आत्मघात ही आहे, असे म्हटले होते. याची जाणीव ठेवून हजार पाचशे रुपयाला मत विकू नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर परिषदेत महिलांकडून केलेल्या अपेक्षेच्या अनुषंगाने सदरील विधानाच्या १०२ व्या वर्धापन दिन व जागतिक महिला दिनानिमित्त आपण ही कार्यशाळा आयोजित केलेली आहे. जेणेकरून ऐतिहासिक संदर्भाची जाणीव ठेवून महिलांनी आपल्या परिवारातील वृद्ध माता-पिता, सासू-सासरे यांचा सन्मानाने सांभाळ केला पाहिजे करिता महिलांचे प्रशिक्षण वर्ग चालविले पाहिजेत. जेणेकरून जीवनाच्या सर्व क्षेत्रात ५०% प्रतिनिधित्व प्रदान केले जाऊ शकेल.

उद्घाटनपर मार्गदर्शन करतांना उपायुक्त नंदा गायकवाड म्हणाल्या की, जागतिक महिला दिनाच्या अनुषंगाने विचार करता बुद्ध धम्मात पहिल्यांदा महिलांना समानतेचे हक्क प्रदान करण्यात आले होते. धम्म ही जीवन जगण्याची कला आहे. आपल्या आचरणातून आपण बुद्ध आहोत, हे इतरांच्या लक्षात यायला हवे. आपणास माहीत असलेले ज्ञान इतरांना सांगितले पाहिजे. महिला सशक्तीकरणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत, जेणेकरून समानता स्थापित होईल.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, महिलांनी आपल्या मुलावर जिजाईप्रमाणे संस्कार करावेत जेणेकरून घराघरात शिवबा निर्माण होतील. आईने आपल्या अपत्यांना आठच्या आत घरात, या पद्धतीची अंमलबजावणी केली तर बऱ्याच प्रमाणात गुन्हेगारीचे प्रमाण कमी होईल.

याप्रसंगी वनिता सरपाते म्हणाल्या की, समाजाची खरी प्रगती तेव्हाच होते, जेव्हा महिलांना सर्व क्षेत्रात संधी दिली जाते. महिलांचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान होय. अनुताई दाभाडे म्हणाल्या की, सुंदरतेपेक्षा वैचारिक महिलेला जास्त सन्मान मिळत असतो. निरंजना वाघमारे म्हणाल्या की, संघटित होण्यासाठी संघर्ष केला पाहिजे. स्वानंदी पाचगावकर म्हणाल्या की, अगर इससे बुरा होता तो क्या होता? हमे जिंदगी से मुस्कुराना सीखना चाहिएख डॉ. कल्पना गंगावणे म्हणाल्या की, बाबासाहेबांच्या लिखाणाचे वर्ग कुणीही घेत नाहीत. करिता आपण सर्वांनी या कार्यशाळेला परिवारासह उपस्थित राहून सहकार्य केले पाहिजे. सम्यक रामटेके म्हणाले की, समाजात महिलांच्या हक्काची पायमल्ली केली जाते, याला पायबंद घातला पाहिजे. परस्त्री ही मातेसमान असते. दंतचिकित्सक डॉ. ज्योती खंदारे म्हणाल्या की, हजारो फुल चाहिये एक माला बनाने के लिए लेकिन एक महिला कॉफी है स्वर्ग बनाने के लिएख होमिओपॅथी तज्ञ डॉ. शितल तीनगोटे म्हणाल्या की, शारीरिक आरोग्यासह मानसिक आरोग्य तेवढेच महत्त्वाचे असते. ॲड. विलास रामटेके म्हणाले की, फुले दांपत्याने कष्ट घेतले नसते, तर आपणास चांगले दिवस पहायला मिळाले नसते. बी. डी. दाभाडे म्हणाले की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनच्या वतीने महिलांची कार्यशाळा संपन्न होत आहे, ही अतिशय आनंदाची बाब आहे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून पंचशील बुद्ध विहाराच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित सर्व महिला प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन तेजस्विनी पांचगावकर यांनी केले. याप्रसंगी आदर्श शिक्षक गजानंद पाचगावकर, डॉ. जोगेंद्र पाचगावकर, कुसुम रहाटे, करूणा दाभाडे, अंकिता ढगे, अश्विनी ढगे, भारती ढगे, सुशीला गायकवाड, जयश्री रगडे, वत्सला इंगळे, सुरेखा रत्नपारखी, रूपाली ईखारे, अनिता गायकवाड, मनीषा गोरे, वंदना वानखेडे, आयुषी दाभाडे, अनुसरा दाभाडे, रजनी पावटेकर, शांताबाई दाभाडे, शकुंतलाबाई बनसोडे, अंजना पैठणे, वच्छला कस्तुरे यासह शेकडो महिलाची उपस्थिती लाभली होती. अशाप्रकारे हर्षोल्हासात मोफत कार्यशाळा संपन्न झाली.

# वन्य प्राण्याची पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती

## वनपरीक्षेत्र अधिकारी देऊळगाव राजा यांचे दुर्लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : देऊळगाव राजा रेंजर कार्यालय अंतर्गत देऊळगाव राजा व सिंदखेड राजा या दोन्ही तालुक्यातील गावामध्ये आता कडक उन्हाळा सुरु झाला आहे.

तापमान ३९, ४० डिग्री सेल्शिअंश वाढले असून मार्च सुद्धा संपत येत असून वन्य प्राणी मात्र पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करत असल्याचे दिसून आले आहे. मात्र अद्यापही संबंधित अधिकारी यांनी मुक्या वन्य प्राण्याची पिण्याच्या पाण्याची कुठेच व्यवस्था केली असल्याचे दिसून येत नाही तरी त्यांनी किमान मुक्या जीवाची पाण्या अभावाची हळहळ व्यथा जाणून त्यांणा पाण्यापासून पिण्यापासून वंचित ठेऊन पापाचे भागीदार न राहता पाण्याने तहान भागावून मन पाण्याने तृप्त करून पुण्याच्या कर्माचे शिलेदार व्हावे.

तसेच आपन वनविभागातच वन्य



प्राण्याच्या पिण्याच्या पाण्यासाठी पाणवठे तयार करून तात्काळ पर्यायी व्यवस्था करावी जेणे करून आपले वन्य प्राणी हे इतर शेतकऱ्यांच्या सुद्धा शेतात जाऊन शेकऱ्याच्या तोंडी आलेला घास हिरा-वून न घेता व कुठेलेचं नुकसान सुद्धा होणार नाही याची दक्षता घेऊन वेळीच त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी व जेणे करून शेतकऱ्याचे नुकसान होणार नाही व आपल्या खात्याकडे पिकनुकसानीचे अर्ज सुद्धा येणार व व आपले व्यर्थ जाणारे अनुदान सुद्धा वाचेल तसेच आपल्या कर्मचारी यांचे काम सुद्धा कमी होईल तरी सुद्धा आपण अद्याप वन्यप्राण्या कडे लक्ष दिले असल्याचे दिसून येत नाही तरी आपण तात्काळ वनपरीक्षेत्र अधिकारी या नात्याने दखल घेऊन आपण केवळ मे मध्ये येणाऱ्या अनुदान काढण्याची वाट न पाहता तात्काळ विल्हेवाट लावावी अन्यथा पुढे कुठेच मे मध्ये खोटे नाटे पाणवठे चे अनुदान काढू देणार नाही अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते गजानन कहाळे यांनी दिली असून लवकरच उत्रृ मेहकर यांच्याकडे सुद्धा लेखी तक्रार करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिला पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पोलिसाची नोकरी व कुटुंब यांची यशस्वी सांगड घालून विविध आव्हानांचा सामना करीत गुन्ह्यांचा उत्कृष्ट तपास समुपदेशनाद्वारे मोडणारे संसार वाचवणे त्याचबरोबर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पोलीस महिला अधिकारी व कर्मचारी यांचा सन्मान जागतिक महिला दिनानिमित्त शहर पोलीस स्टेशनच्या वतीने सहाय्यक पो-लीस अधीक्षक प्रशांत डगळे व शहर पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.



जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा व शालेय विद्यार्थ्यांनीचा सन्मान करण्यासाठी पंढरपूर शहर पोलीस स्टेशनच्यावतीने पोलीस संकुल पंढरपूर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आजच्या समाजव्यवस्थेत स्त्रिया कुटुंब, सेवा, शिक्षण तसेच सामाजिक क्षेत्रात अत्यंत जबाबदारीने कार्य करत आहेत. तसेच सर्वच क्षेत्रांत स्वतःची ओळख निर्माण करत आहेत. जिद्द, निष्ठा आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. तसेच समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीतही मोलाची भूमिका बजावत आहेत.

त्यामुळे आजचा दिवस केवळ त्यांचा सन्मान करण्याचा नाही, तर त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवण्याचा असल्याचे मत सहा. पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी पंढरपूर उपविभागातील महिला अधिकारी ,पोलीस ठाणे येथील महिला पोलिस अंमलदार तसेच पंढरपूर शहरातील प्रतिष्ठीत महिला, डॉक्टर , महाविद्यालयीन शिक्षिका व शालेय विद्यार्थिनी यांचा सन्मान करण्यात आलेला आहे.

# नूतन पंचायत समिती सदस्य वंदना फाटे यांचा फाटे परिवाराच्या वतीने सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नुकत्याच पार पडलेल्या पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुकीत टाकळी पंचायत समिती गणातून बहुमताने निवडून आलेल्या श्रीमती वंदना भीमराव फाटे यांचा गादेगाव येथे फाटे परिवाराच्या वतीने सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी गादेगाव सोसायटीचे चेअरमनश्री शशिकांत बागल, गादेगाव ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब बागल, डॉ. रमेश फाटे, विनायक फाटे, उमेश फाटे, शुभम फाटे, सोल-ापूर डीसीसी बँकेच्या माजी संचालिका सौ.सुनीता शशिकांत बागल, सौ.शोभा फाटे, सौ. सीमा फाटे, सौ. स्वाती फाटे यांच्यासह गादेगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खामसवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी:प्रतिनिधी/ हनुमंत पाटुळे, कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महिला दिन मोठया उत्सहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन महिलांनी केले.या वेळी शाळेतील विद्यार्थिनींनी विविध वेशभूषा परिधान केल्या होत्या. तसेच भाषणे, नृत्य सादर केले. यातून कर्तृत्वान महिलांची थोरवी गायली. त्यासबोतच महिलांनी ही भाषणे केली.या वेळी महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी उखाणे घेण्याची व संगीत खुर्ची यांची स्पर्धा घेण्यात आली आली. उखाणे स्पर्धेत प्रथम क्रमांक शुभांगी राम शेळके, द्वितीय क्रमांक शीतल रमेश शेळके, तर तृतीय क्रमांक वैशाली प्रल्हाद शेळके यांनी मिळवला. संगीत खुर्ची स्पर्धेत प्रथम क्रमांक माधुरी विनोद माने,द्वितीय क्रमांक सिमा सचिन डोईफोडे, तर तृतीय क्रमांक दीपाली ईश्वर डोईफोडे यांनी पटकवला. सदर विजेत्यांना आकर्षक गृह उपयोगी बक्षिसे वाटप करण्यात आली. तर प्रोत्साहन पर बक्षीस म्हणून श्री. शिवाजी बोबडे यांनी सर्व स्पर्धेतील विजेते यांना प्रत्येकी शंभर रुपये प्रमाणे सहाशे रुपये रोख बक्षीस दिले. यावेळी महिलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. या कार्यक्रमासाठी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजकुमार शेळके,उपाध्यक्ष श्रीनिवास झोरी, पत्रकार श्री.



### महिला दिनानिमित्त विविध स्पर्धा संपन्न

हनुमंत पाटुळे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील महिला शिक्षिका श्रीम. किरदत्त संगिता, रितापुरे रेखा, मुळे वैशाली, सहशिक्षक गायकवाड विश्वास,लोखंडे सा-तलिंग, शेळके नागनाथ,बाकले शिवराज यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी व गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांचा समस्या, दर्शन व प्रवचन सोहळ्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : जगद्गुरु रामनंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज, जगद्गुरु रामानंदाचार्य दक्षिण पीठ, नाणीजधाम यांचा समस्या मार्गदर्शन, दर्शन व प्रवचन सोहळा दि. १४ व १५ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता म्हसोबा मंदिराजवळ, जळगाव रोड, चौका, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम संस्थानाच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आला असून यामध्ये हजारो भाविक सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या दोन दिवसीय कार्यक्रमात जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज भाविकांना जी-वनातील विविध समस्या, आध्यात्मिक मार्गदर्शन तसेच समाजहिताचे विचार मांडणार आहेत. यावेळी भाविकांना महाराजांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याचीही संधी उपलब्ध होणार आहे.



संस्थानाच्या माध्यमातून समाजोपयोगी अनेक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. ग्रामस्वच्छता अभियान, शैक्षणिक उपक्रमांतर्गत इंग्रजी माध्यमाच्या मोफत शाळा, मोफत वेद-पाठ शाळा, आरोग्य उपक्रमांतर्गत मोफत दवाखाने, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन असे विविध सामाजिक उपक्रम संस्थानाच्या माध्यमातून राबवले जातात.महिला सक्षमीकरणासाठी मोफत शिलाई मशीन वाटप, मोफत घरघंटी वाटप, तसेच गरजूंना आपत्कालीन मदत, कायदेविषयक साक्षरता शिबिरे अशा अनेक उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडविण्याचे कार्य संस्थान करत आहे.

रक्तदान चळवळीतही संस्थान अग्रेसर असून जानेवारी २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरांद्वारे अवघ्या १५ दिवसांत तब्बल १ लाख ७१ हजार १५० रक्तकुप्यांचे संकलन करून महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र रक्त संक्रमण परिषदेकडे सुपूर्द करण्यात आले. तसेच एक पेड गों के नाम या वृक्षारोपण उपक्रमांतर्गत नोव्हेंबर २०२५ मध्ये १ लाख १० हजार ६८७ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. महामार्गावरील अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी संस्थानच्या वतीने राज्यातील विविध राष्ट्रीय महामार्गांवर ५३ मोफत रुग्णवाहिका सेवा सुरू असून आतापर्यंत ३१ हजारांहून अधिक जखमींचे प्राण वाचवण्यात यश आले आहे. तसेच ब्लड इन नीड या उपक्रमांतर्गत गरजू रुग्णांना थेट रुग्णालयात जाऊन आतापर्यंत २५ हजारांहून अधिक रुग्णांना रक्त उपलब्ध करून देण्यात आले आहे.

याशिवाय सप्टेंबर २०१६ ते मार्च २०२६ या कालावधीत १८३ मरणोत्तर देहदान आणि १३१ मरणोत्तर अवयवदान करून समाजसेवेचा आदर्श संस्थानने निर्माण केला आहे.या कार्यक्रमादरम्यान दि. १४ मार्च रोजी साधक दीक्षा तर दि. १५ मार्च रोजी उपासक दीक्षा कार्यक्रम पार पडणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त भाविकांनी या दीक्षा कार्यक्रमासाठी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.दोनही दिवस कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. मराठवाडा उपपीठ अंतर्गत जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक, साधक, शिष्य व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रवचन व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मराठवाडा पीठ समिती व धाराशिव जिल्हा सेवा समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जागतिक महिला दिनी श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयातील महिलांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . याप्रसंगी विद्यालयाचे आदरणीय प्राचार्य श्रीमान वैजनाथ घोडके सर पर्यवेक्षक डॉ. पेटकर सर तसेच सर्व महिलांच्या हस्ते शिक्षण क्षेत्रातील आधुनिक सरस्वती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, महिलांचे शिक्षण सर्वप्रथम सुरू करणाऱ्या, शिक्षिका म्हणून तसेच मुख्याध्यापिका म्हणून कार्य करणाऱ्या, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.



विद्यालयातील, वसतिगृहातील, मेस विभागातील सर्व महिला कर्मचारी, सर्व बी.व्ही. जी. कर्मचारी यांच्या हस्ते शिक्षण सम्राज्ञी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयाचे आदरणीय प्राचार्य श्रीमान घोडके सर यांच्या हस्ते सर्व महिलांचे पेन व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले . या प्रसंगी महिला दिनानिमित्त मुलांचा पहिला गुरु ही आई असते म्हणून माझी आई या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली . याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य श्रीमान घोडके सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले . आपल्या विद्यालयातील सर्व महिला शिक्षिका वस्तीगृहातील मेस विभागातील तसेच स्वच्छता विभागातील सर्व महिला कर्मचारी यांनी अतिशय मेहनत घेऊन स्वच्छतेचे काम पूर्ण केले आहे त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले आज महिला पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर कार्य करीत आहेत इतकेच नव्हे तर देशाचे राष्ट्रपती पद भूषवण्याचा मान ही महिलांचा आहे असे गौरव उद्गार काढले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन इयत्ता आठवी अ चा कुणाल नरवडे या विद्यार्थ्यांनी केले.

## पत्रकार संघाच्या वतीने जागतिक महिला दिन ओतूरमध्ये साजरा

# ग्रामपंचायतच्या साफ सफाई महिला कर्मचाऱ्यांना साडी व सन्मानचिन्ह देऊन गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने राज्यभर सामाजिक उपक्रम सुरु असतात. त्याच धर्तीवर जुन्नर तालुका पत्रकार संघाच्या वतीने वतीने आगळा वेगळा उपक्रम हाती घेण्यात आला. ओतूर शहरातील ग्रामपंचायतच्या महिला सफाई कामगारांना महिला जागतिक दिनानिमित्त सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य सौ डॉ छाया तांबे व पंचायत समिती सदस्य श्री प्रशांत डुंबरे यांची उपस्थिती लाभली. या महिलांचा सन्मान राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गावकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते साडी व सन्मान चिन्ह देऊन करण्यात आला. समानार्थी महिलांमध्ये सौ शोभा फाले, सौ उज्वला सोनवणे सौ वैशाली,जाधव माळवे, सौ वैशाली सरोदे,सौ पुनम अस्वार सौ अनुसया गायकवाड, सौ साधना अस्वार, सौ मालती अस्वार, सौ अनिता कदम यांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर नवनिर्वाचित सदस्य डॉ छाया तांबे महाराष्ट्र राज्य नागरिक पत्रकार संघाच्या वतीने यांचाही सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी डॉ विश्वासराव आरोटे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, आमचा पत्रकार संघ देणाऱ्यांचा संघ आहे घेणाऱ्यांचा नाही.पत्रकार संघामध्ये गर्दी पेक्षा दर्दी हवे आहेत असेही त्यांनी बोल-ताना सांगितल. पत्रकार संघाच्या वतीने केलेला महिलांचा सन्मान हा प्रेरणादायी आहे. यावेळी पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख सुभाष डोके,ज्येष्ठ पत्रकार दादा रोकडे,माझी तालुका अध्यक्ष राजेश डोके,नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष नयन डुंबरे, संपर्कप्रमुख रवी गजे, विकास घडगे, सुदर्शन मंडले,शौकत शेख,किरण पानसरे,वैभव सस्ते,रंजना घोलप,प्रवीण कर्डिले आदी पत्रकार उपस्थित होते.

सन्मान सोहळा संपन्न झाल्यानंतर पत्रकार संघाची कार्यकारणी निवड प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये जिल्हा प्रसिद्धी प्रमुख म्हणून राजेश डोके तर महिला तालुका अध्यक्षपदी सौ रंजना घोलप तालुका संपर्कप्रमुख पदी पुन्हा रवि गजे यांची नियुक्ती करण्यात आली , तालुका उपाध्यक्षपदी शौकत शेख, तालुका सचिव पदी सुदर्शन मंडले, तालुका संघटक पदी वैभव सस्ते, यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार रंजना घोलप यांनी केले तर उप-स्थित मान्यवरांचे आभार रवी गजे यांनी मानले.

